ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-III October 2013

# शैक्षणिक मूल्यमापनाचा विकास : संशोधन साहित्याचा अभ्यास

प्रा. सुरेंद्र चंद्रकांत हेरकळ,
पीएच. डी. विद्यार्थी,
आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय,
शिक्षणशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे

*सारांश :*

*मूल्यमापनाच्या प्रक्रियेमध्ये परीक्षा हा महत्त्वपूर्ण घटक आहे. आणि शैक्षणिक प्रक्रियेमध्ये ही परीक्षा महत्त्वपूर्ण भाग आहे. कारण परीक्षेमुळे आपल्याला समजते की, विद्यार्थ्यांला ज्ञानाचे आकलन किती झाले आणि शिक्षकाने ज्ञानदान किती केले आहे. अशा मूल्यमापनामुळे मानव समाजाच्या विकास, प्रेरणा, प्रशिक्षण आणि मानवी क्षमतांचा विकास होतो. म्हणजेच शिक्षण प्रक्रियेमध्ये परीक्षा ही महत्त्वपूर्ण आहे.*

**मुख्य संज्ञा** : सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन , मूल्यमापन, शिक्षक, विद्यार्थी

विद्यापीठ शिक्षण आयोग (1948–49) यांच्या अहवालामध्ये ठळकपणे म्हटले आहे की, आपल्याला शैक्षणिक क्षेत्रात काही बदल हवे असतील तर ते परीक्षेमध्ये आहे ; आणि हे बदल करण्याचे काम ब–याच आयोगांनी केले आहे. जसे माध्यमिक शिक्षण आयोग (1952), विद्यापीठ परीक्षा सुधारावरील डोंग्रक समिती (1957), कोठारी आयोग (1964–66), परीक्षा सुधार (1969), सायलॉनचा परीक्षा सुधार चर्चासत्र (1970), परीक्षा सुधारावरील मधुराई कार्यशाळा (1974), विद्यापीठ अनुदान आयोगाचा कृतिकार्यक्रम (1971,1973, 1976), राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (1986), कृतिकार्यक्रम (1992), राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (2000, 2005) आणि शिक्षक प्रशिक्षक राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (2009) या सर्व वरील आयोग, समिती आणि त्यांचे अहवाल परीक्षा प्रक्रियेमध्ये खालील बदल करू इच्छितात.

1. अंतर्गत मूल्यमापनाचा समावेश करावा.
2. मूल्यमापन हे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाव्दारे असावे.
3. परीक्षेसाठी प्रश्नपेढी आणि वस्तुनिष्ठ प्रश्न हे आवश्यक आहे.
4. विद्यापीठाने सत्र पध्दती सुरू करणे आवश्यक आहे.

5. गुणांच्या जागी श्रेणी देण्यात यावी.
6. राष्ट्रीय लोकसेवा परीक्षा आणि पुस्तकासह परीक्षा सुरू करणे आवश्यक आहे.
7. इच्छेवर आधारित सत्र पध्दती (Choice Based Credied System) असावी.

**संदर्भ साहित्याचा आढावा :**

लेले (1962), कामत (1968) जेव्हरी आणि पटेल (1968), रवी (1989), धाबीर (1989) यांच्या संशोधनामधील निष्कर्षामध्ये दिसून आले की, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाविषयी शिक्षकांमध्ये असंतुष्ठता दिसून आली.

पिल्ले, (1986) मोहन (1986), मल्होत्रा, मेनन, बेढी आणि तुलसी (1989) यांना दिसून आले की, अंतर्गत मूल्यमापन प्रक्रियेविषयी शिक्षणामध्ये असंतोष दिसून आला. तसेच अंतर्गत मूल्यमापनाविषयी त्यांच्या मनात भरपूर प्रश्न निर्माण झाले आहेत. बाहय मूल्यमापन आणि गुण यांचा सहसंबंध सुध्दा विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये धनात्मक बदल घडून आलेला नाही.

रेड्डी (1977), गुणासेकरण आणि जयंती (1979), रसूल (1981), स्वरूप (1981), शर्मा (1981), रवी (1989), प्रसाद (2001) यांच्या मते, अंतर्गत आणि बाहय मूल्यमापनामध्ये बरीच तफावत दिसून आली.

सत्र पध्दतीमुळे मूल्यमापन प्रक्रियेमध्ये सातत्य निर्माण झाले असे टॉग (1977), पटेल (1978), अख्तर (1980), रोशतन (1980) यांना संशोधनाव्दारे दिसून आले.

सातत्यपूर्ण मूल्यमापनामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास सवयी निर्माण झालेल्या आहेत, असे लोहानी (1965), अख्तर (1980), धाबीर (1984), पिल्लायी आणि मोहन (1986) यांच्या संशोधनात दिसून आले.

ज्या शिक्षकांना सत्र पध्दतीचा अनुभव होता ते शिक्षक सत्र पध्दती लागू करण्याच्या बाजूने होते. असे रेड्डी (1977) यांच्या संशोधनाव्दारे आढळून आले.

विद्यार्थीनीपेक्षा विद्यार्थी आणि शिक्षक यांचा सातत्यपूर्ण अंतर्गत मूल्यमापनाकडे अधिक कल होता असे टॅग (1977), पटेल (1978), रवी (1989) यांच्या संशोधनाव्दारे दिसून आले तर पिल्लायी (1979) यांच्या संशोधनाव्दारे याच्या विरूध्द विद्यार्थीनीचा कल हा विद्यार्थ्यांपेक्षा अधिक होता.

काही संशोधनातील निष्कर्षाव्दारे रेड्डी (1977), पटेल (1978), गुणासेकरण आणि जयंती (1979), रसूल (1981), स्वरूप (1981), शर्मा (1981), रवी (1989), प्रसाद (2001) यांच्या मते, अंतर्गत आणि बाहय मूल्यमापनाविषयी शिक्षकांमध्य अनेक प्रश्न निर्माण झालेले होते.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-III October 2013

कामत (1986), गुणासेकरण आणि जयंती (1979), रसूल (1981), स्वरूप (1981), शर्मा (1981), रवी (1989) यांनी केलेल्या संशोधनानुसार कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखेतील विद्यार्थ्यांची अंतर्गत मूल्यमापनाविषयी असलेल्या अभिवृत्तीचा सहसंबंध हा विषम आला. गुणासेकरण आणि जयंती (1979), रसूल (1981) यांच्या संशोधनानुसार कला, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांची अंतर्गत मूल्यमापनाविषयी असलेल्या अभिवृत्तीचा कल हा विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांच्या पेक्षा अधिक होता.

विद्यार्थ्यांच्या लिंग, जात आणि सवयीला अनुसरून सातत्यपूर्ण अंतर्गत मूल्यमापनाकडे पाहण्याची विद्यार्थी आणि शिक्षकांची अभिवृत्तीचा अभ्यास वरील संशोधनांव्दारे करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :**

वरील सर्व संशोधनाचा अभ्यास केला असता दिसून येते की, शैक्षणिक विकासात मूल्यमापनाचा विकास होणे हे गरजेचे आहे. यामुळे शालेय स्तरापासून ते विद्यापीठीय स्तरापर्यंत मूल्यमापनात मूलभूत बदल होणे महत्त्वाचे आहे. व या मूल्यमापन बदलांचा स्विकार करून त्याविषयी संशोधन होणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

1. Buch, M. B. (ed.) (1979). Second Survey of Research in Education. Baroda: Society for Educational Research and Development.
2. Buch, M. B. (ed.) (1987). Third Survey of Research in Education. New Delhi: NCERT.
3. Buch, M. B. (ed.) (1991). Fourth Survey of Research in Education (Vol.I & II). New Delhi: NCERT.
4. Desai, D. M. (1970). Some Critical issues of Higher Education in India, Mumbai: Educational Publisher.
5. Edwads, A. L. (1969). Techniques of Attitude scale construction, Bombay: Vakils' Feffer and Simons Pvt. Ltd.
6. Fishbein, M. (1967). Reading in Attitude Theory and measurement, New York: John Wiley and Sons.
7. Garrett, H.E. & Woodworth, R.S.(1966). Statistics in Psychology and Education (11th ed.), New York : David Mekay Company.

8. Gay, L. R. and Airasian, P.(2000). Educational Research Competencies for Analyisis and Application (6th ed.), New Jersey: Prentice Hall.
9. Ghosh, J. (2006, June 17). Case for caste-based Quota in Higher Education. Economic and Political Weekly, Vol. 2428(24), pp. 15-18.
10. Government of India (1950). The report of The University Education Commission (December 1948-August 1949) Vol I. Shimla : The Manager, The Government of India Press [online] Available
11. Government of India (1967). The Kothari commission report 1964-66. New Delhi: Ministry of Human Resource Development.
12. Government of India (2000). National Curriculum Framework for School Education 2000, New Delhi: Ministry of Human Resource Development.
13. Lal, J. P. (2006). Educational Measurement and Evaluation, New Delhi: Anmol Publications Pvt. Ltd.
14. Government of India (2005). National Curriculum Framework for School Education 2005, New Delhi: Ministry of Human Resource Development.
15. Government of India (2009). National Curriculum Framework for Teacher Educators 2009, New Delhi: Ministry of Human Resource Development.